**आदेश**

जा.क्र. ४१५५/कोरोना/मनाई/ आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक - १४/०४/२०२०

**विषय :-कोरोना संक्रमणशील क्षेत्राची व्याप्ती वाढवुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दि.१५/०४/२०२० चे ०६.०० वा. ते दि.०३/०५/२०२० चे २४.०० वा. पर्यंत सदर क्षेत्रांत संचारबंदी आदेश लागु करणेबाबत.**

(२) ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पुणे शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्यशासनाने कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रसार प्रतिबंधित करण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांचेकडील जा.क्र.२१०५/ कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.२७/०३/२०२० अन्वये **वाहनांचे वापरास मनाई**, जा.क्र.२२५०/ कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.३१/०३/२०२० अन्वये **जमावबंदी** तसेच जा.क्र.३०८८/ कोरोना/ मनाई/ आदेश/ २०२०, दि.०७/०४/२०२० अन्वये पुणे शहरातील **कोरोना संक्रमणशील क्षेत्रात संचारबंदी** आदेश लागू करण्यात आलेले आहेत. पुणे शहरातील काही भागात कोरोनाबाधित रुग्णांची संख्या चिंताजनकरित्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जीविताला, आरोग्याला किंवा सुरक्षितेतला संकट उत्पन्न होऊ शकते याची माझी खात्री झालेली आहे. त्यामुळे **पुणे शहरातील यापुर्वी जाहीर झालेल्या कोरोना संक्रमणशील क्षेत्राची व्याप्ती वाढवुन** वरील नमूद आदेशांत अंशतः बदल करून दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी अधिक गांभीर्याने व कडक स्वरूपात करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सारासार विचार करून तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार कामानिमित्त पुण्यात प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

(३) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-१ मध्ये उप-विभाग यांचे कडील अधिसुचना क्रमांक ३ मधील पान क्र. ४ मधील फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चा क्र.एमएससी-१२७४/व्ही-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ (II -1974) चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन नियुक्त करुन कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

(४) त्याअर्थी मी, डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्राच्या परिच्छेद ०५ मध्ये नमूद केलेल्या कोरोना संक्रमणशील क्षेत्रातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतूकीने रस्त्यावर, गल्लोगल्ली या ठिकाणी संचार, वाहतूक, फिरणे, उभे राहणे, थांबून राहणे, रेंगाळणे या सर्व कृत्यांस परिच्छेद ०६, ०७ व ०८ मधील तरतुदींच्या अधीन राहून मनाई करणारा आदेश **दि.१५/०४/२०२० चे ०६.०० ते दि.०३/०५/२०२० चे २४.०० वा. चे दरम्यान** लागू करीत आहे.

(५) पुणे शहरातील यापुर्वी घोषित केलेल्या कोरोना संक्रमणशील क्षेत्राची व्याप्ती खालीलप्रमाणे वाढविणेत येत आहे.

## ❖ परिमंडळ - ०१

### ➢ खडक पोलीस स्टेशन

- गंजपेठ परिसर
  माशेआळी चौक - लहुजी वस्ताद तालीम चौक - पुणे मनपा कॉलनी नंबर ६ - लोहियानगर पोलीस चौकी चौक - ओझा रेशनिंग दुकान चौक - महात्मा फुले वाडा कमान - चाँदतारा चौक

- काशेवाडी भवानी पेठ परिसर
  पिंपळेमळा भिमाले संकुल (सोनावणे हॉस्पीटल शेजारी) - भगवा चौक (तुषार पाटील यांचे घराशेजारी) - अशोक रिक्षा स्टॅण्ड - सुंदरम इडली लेन - धम्मपाल चौक - गोल्डन ज्युबली चौक - आनंदनगर मित्रमंडळ चौक (बीएसएनएल ऑफिस शेजारी) - १० नंबर कॉलनी (मिरा दोडके स्टोअर्स शेजारी) - १० नंबर कॉलनी सारनाथ बुध्द विहार

## ❖ परिमंडळ - ०२

### ➢ बंडगार्डन पोलीस स्टेशन

- सिटी पॉईंट - उल्हासनगर - नदी किनार झोपडपट्टी - ताडीवाला रोड परिसरातील उत्तरेकडील बाजू
- जहाँगिर चौक - लडकतवाडी - मेरू हॉटेल चौक - चव्हाण चाळ - लोकसेवा वसाहत परिसर झोपडपट्टी - के टाईप रेल्वे बिल्डींग - महात्मा फुले वसाहत - दुष्काळ झोपडपट्टी - वनाप्पा चौक झोपडपट्टी परिसर - बालमित्र मंडळ झोपडपट्टी - विश्वदिप तरूण मंडळ परिसर झोपडपट्टी - उल्हासनगर ते शुरवीर झोपडपट्टी संपूर्ण नदी किनारी परिसर - डिझेल कॉलनी समोरील झोपडपट्टी परिसर - कपिला डेअरी वसाहत झोपडपट्टी - सिध्देश्वर मंडळ वसाहत झोपडपट्टी
- सौरभ हॉल - जगताप चाळ - दिपगृह समोरील बाजू - राजगुरू चौक - रेल्वे कॉलनी (आर.बी.१) - भाजी मार्केट रोड - संगिता झोपडपट्टी वसाहत - प्रगती मित्रमंडळ वसाहत - सिध्देश्वर चौक झोपडपट्टी वसाहत - ललकार मित्रमंडळ - जनसेवा मित्रमंडळ खड्डा झोपडपट्टी - नवचैतन्य मित्रमंडळ - मारुती मंदीर चौक वसाहत - भीम टोला मित्रमंडळ - भीम संघटना झोपडपट्टी परिसर - सारीपुत्र बुध्दविहार झोपडपट्टी वसाहत - राजरत्न बुध्दविहार झोपडपट्टी परिसर
- मध्य रेल्वे डीआरएम ऑफीस जवळ लुंबीनिनगर - पत्राचाळ - गल्ली नं. १ ते ४८ - प्रभाग क्र. २० व इनाम मस्जिद परिसर (संपूर्ण) - इंदीरानगर झोपडपट्टी - इनामनगर वसाहत - सर्व रेल्वे कॉलनी - पानमळ परिसर - कुमार पिनॅकल बिल्डींग - सरस्वती सोसायटी - विनायक नगरी समोरील झोपडपट्टी परिसर - पाच बिल्डींग परिसर - स्वीपर चाळ - शुरवीर चौक परिसर वसाहत - नाल्यावरची झोपडपट्टी नदी किनारी जाणारा रोड
- नायडू हॉस्पिटल जवळील वसाहत - काची वस्ती झोपडपट्टी

## ❖ परिमंडळ - ०३

➢ **सिंहगड रोड पोलीस स्टेशन**

- राजीव गांधीनगर

➢ **दत्तवाडी पोलीस स्टेशन**

- पर्वती दर्शन परिसर
- शिवदर्शन परिसर

➢ **वारजे पोलीस स्टेशन**

- रामनगर
- गोकुळनगर पठार
- तिरुपतीनगर

➢ **कोथरुड पोलीस स्टेशन**

- काळेवाडी
- सुतारदरा
- जय भवानीनगर

## ❖ परिमंडळ - ०४

➢ **विश्रांतवाडी पोलीस स्टेशन**

- कळसगांव - कळसगांव मुख्य रस्ता - आर.एन.डी रस्ता - ॲड. धापटे चौक - दर्गाशेजारील रस्ता
- म्हस्के वस्ती - शारदा हॉटेल - ट्रीडम पार्क
- चव्हाण चाळ - मच्छी मार्केटरोड - शांतीनगरकडून जाणारा रोड - फुलबाजार रोड
- भीमनगर - गांधी टपरी - बीआरटी बसस्टॉप शेजारील रस्ता
- वडार वस्ती - ममता गिफ्ट शॉपी रोड - धानोरी रोडला बाहेर पडणारा रोड
- श्रमिक नगर - विद्यानगर शेवटचा बसस्टॉप - भैरवनगर कडून जाणारा रोड
- धानोरी गावठाण - धानोरी गावठाण रस्ता - विठ्ठल मंदीर समोरील रस्ता -
- मुंजाबा वस्ती - मुंजाबा वस्ती गणपती मंदीर चौक - गल्ली क्र.१३ मधून जाणारा रस्ता - गल्ली क्रमांक ०९ मधून येणारा रस्ता
- भैरवनगर - साई विराज हॉटेल चौक - महाराणा प्रताप चौक गल्ली नं. ०१ ते ११
- गोकुळ नगर - गोकुळनगर बसस्टॉप - भरत ढाबा चौक गल्ली नं. ०१ ते ०६ - आंबेडकर हायस्कूल

➢ **खडकी पोलीस स्टेशन**

- सम्राट हॉटेल, भोसले वाडी, कामगार आयुक्त कार्यालय, इराणी वस्ती, महात्मा गांधी पाटकर प्लॉट, नाबार्ड बँक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग चौक, पाटील इस्टेट चौक, संगमवाडीकडे जाणारा पुल, पाटील इस्टेट गल्ली नं. ०१ ते १०, इमर्सन कंपनी, गोदरेज कंपनी, शॉपर स्टॉप, विल्यमनगर, अल्फा पेट्रोल पंप, पीएमसी कॉलनी वाकडेवाडी

➢ **चंदननगर पोलीस स्टेशन**

- प्रभाग क्र.०५
  आनंद पार्क - स्टेला मेरी स्कुल - सिध्दीविनायक मंदीर - टेम्पो चौक

➢ **विमानतळ पोलीस स्टेशन**

- गांधीनगर - जयप्रकाश नगर

➢ **येरवडा पोलीस स्टेशन**

- लक्ष्मीनगर परिसर, रामनगर, जयजवान नगर
  हरीगंगा सोसायटी - आंबेडकर सोसायटी - डेक्कन कॉलेज कॉम्प्लेक्स - रामनगर - पांडू लमाण वस्ती - जयजवान नगर - लक्ष्मीनगर - अशोकनगर - म्हाडा वसाहत - बीडी कामगार वसाहत - माणिकनगर - कामराज नगर- गणेशनगर - यशवंत नगर - नवी खडकी - सुभाष नगर - भीमा शंकर वसाहत - काश्मिरी कॉलनी - चित्रा चौक - कुमार आंगण सोसायटी - मदर तेरेसा नगर - गाडीतळ - पर्णकुटी - शनीनगर - येरवडा गावठाण - कंजारभाट वस्ती

## ❖ परिमंडळ - ०५

➢ **हडपसर पोलीस स्टेशन**

- वैदु वाडी, म्हाडा कॉलनी परिसर रेल्वे लाईन जवळील वसाहतीसह

**(६) सदर मनाई आदेशातून खालील प्रमाणे सवलतीचे निकष राहतील.**

**अ)** वरील मनाई आदेश पोलीस, संरक्षण दल, आरोग्य विभाग, दवाखाना, औषधालय, अत्यवस्थ रुग्णाची वाहतुक, कोरोना प्रतिबंधक उपाययोजना संबंधित पुणे महानगरपालिका व इतर शासकीय सेवा, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी (कर्फ्यु पाससह) तसेच माझ्यावतीने परवानगी दिलेल्या व्यक्ती यांना लागू नसतील. मात्र त्यासाठी त्यांनी त्यांचे अधिकृत ओळखपत्र, आवश्यक कागदपत्रे व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

**ब)** वर नमूद प्रतिबंधित भागामध्ये कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव अधिक असल्याचे निदर्शनास आल्याने येथील नागरिकांच्या हालाचालींवर निर्बंध आणणे आवश्यक ठरले आहे. त्यामुळे सदर भागातील (परिच्छेद ०६.अ मधील नमुद व्यक्ती व सेवा वगळता) इतर नागरिकांना विविध कारणांसाठी यापुर्वी विविध शासकीय आस्थापनांकडून देण्यात आलेली वाहन वापर व वाहतूकीची सवलत रद्द करण्यात येत आहे.

**क)** परिच्छेद ०६.अ मधील नमुद व्यक्ती व सेवा वगळता इतरत्र कर्तव्यार्थ असलेल्या व्यक्तींना प्रतिबंधित क्षेत्रातून शहराच्या अन्य भागात प्रवास करणे आवश्यक असल्यास, अशा व्यक्तींची त्यांच्या कर्तव्याचे ठिकाणी वास्तव्याची सुविधा संबंधित आस्थापनांनी उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून कोरोना संक्रमणशील क्षेत्रातील त्यांच्या हालचालींवर निर्बंध घालणे शक्य होईल.

(७) **नागरिकांना दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व सेवा खालीलप्रमाणे उपलब्ध होतील.**

**अ)** परिच्छेद ०५ मधील नमूद प्रतिबंधित क्षेत्रातील जीवनावश्यक वस्तू व सेवा (दुध व दुग्धोत्पादन, किराणा माल, फळे व भाजीपाला इ.) पुरविणारी केंद्रे दिवसभरात केवळ दोन तास (सकाळी १०.०० ते १२.०० वा. पर्यंत) ग्राहकांना विक्रीसाठी सुरू ठेवण्यास प्रशासनांकडून परवानगी देण्यात येईल. तशी त्याबाबत सविस्तर उद्घोषणा करण्यात येईल.

**ब)** जीवनावश्यक वस्तू व सेवा पुरविणा-या केंद्रांच्या ठिकाणी कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्याकरीता जाणीवपूर्वक गर्दी टाळावी व त्यासाठी आवश्यक सामाजिक अंतराचे भान ठेवावे. अन्यथा पोलीसांकडून सदर दुकाने बंद करण्यास भाग पाडले जाईल व नागरिकांना घरी परत जाण्याचे निर्देश दिले जातील. ग्राहकांना खरेदीसाठी उपलब्ध न झालेल्या कालावधीची भरपाई देण्याची तजवीज आवश्यकतेनुसार ठेवली जाईल.

**क)** नमुद प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या बँकींग सुविधांसाठी सर्व बँकांनी आपली केवळ ए.टी.एम. केंद्रे कार्यान्वित ठेवावीत, मात्र शासकीय अनुदान वितरणाशी व अत्यावश्यक सेवांशी संबंधित बँकांच्या शाखा चालु राहतील. प्रतिबंधित क्षेत्रातील बँकांच्या कार्यप्रणालीबाबत सविस्तर आदेश दि.१५/०४/२०२० रोजी स्वतंत्ररित्या निर्गमीत केले जातील.

(८) परिच्छेद क्र. ६ व ७ मध्ये नमुद सवलतींच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळणेकरीता आरोग्य विभागाकडून सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे (उदा. मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे ) काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

(९) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदी व प्रचलित कायदयांन्वये शिक्षेस पात्र राहील.

(१०) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन,
सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.१४/०४/२०२० रोजी दिलेला आहे.

**(डॉ. रवींद्र शिसवे)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- १४/०४/२०२०**